# * सारस्वत विद्यालय ६३ वर्षांची वाटचाल *

गोमंतकावरील पोर्तुगीजांच्या प्रदीर्घ राजवटीपैकी १५१० ते १९१० हा चारशे वर्षांचा कालखंड म्हणजे गोमंतकीय हिंदु समाजाच्या जीवनांतील एक अंधारयुग होते. या अंधारयुगांत हिंदु समाजाला राजकीय हक्क नव्हते, सामाजिक प्रतिष्ठा नव्हती आणि धार्मिक स्वातंत्र्य नव्हते. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत गोव्यातील हिंदु समाज जीवन व्यतीत करीत होता. आधुनिक शैक्षणिक क्षेत्रात आपल्या ख्रिश्चन बांधवांच्या मानाने तो मागासलेला होता. गेल्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या, विशेषतः महाराष्ट्रांतल्या शिक्षणपद्धतीस अनुसरून गोव्यातल्या हिंदु समाजाने प्राथमिक मराठी शिक्षणाच्या क्षेत्रांत स्वतःच्या जवाबदारीवर थोडीबहुत हालचाल सुरू केली होती, परंतु पोर्तुगीज शिक्षणाबाबत मात्र खूपच अनास्था होती. हजारात एकादाच हिंदु विद्यार्थी पोर्तुगीज शिक्षणाकडे वळे. उच्च शिक्षण घेऊन पुढे आलेले डॉक्टर, वकील, प्राध्यापक वा सरकारी अधिकारी तर हिंदु समाजांत दुर्मिळ होते. तसे ते निर्माण झाले असते तरी कॅथोलिक धर्मीय पोर्तुगीज राजवटीत त्यांच्या कर्तबगारीला वाव मिळणें शक्यही नव्हते. एका विचित्र मानसिक दडपणाखाली तत्कालीन हिंदु समाज जगत होता.

## रिपब्लिक मुळे विकासाची वाटचाल

अशा परिस्थितीत १९१० मध्ये पोर्तुगालात राज्यक्रांति होऊन राजेशाही नष्ट झाली आणि रिपब्लिकची स्थापना झाली. या एका घटणेमुळे गोव्यातील हिंदु समाजावरील मानसिक दडपण दूर झाले. त्याने रिपब्लिकचे दोन्ही बाहू उभारून न भूतो असे स्वागत केले. या नव्या राजवटीने पोर्तुगाल हे एक धार्मिक राष्ट्र नसून निर्धर्मि राज्य असल्याची जी घोषणा केली ती घोषणाच गोव्यातील हिंदु समाजाने रिपब्लिकचे स्वागत करण्याचे प्रमुख कारणहोते. आलेल्या या नव्या संधीचा फायदा घेऊन हिंदु समाजानें आपल्या प्रगतीच्या दिशेने वाटचालीस प्रारंभ केला. विद्यार्थ्यांनी सरकारी प्राथमिक व माध्यमिक तसेच उच्च पोर्तुगीज शिक्षण संस्थात प्रवेश केला मराठी प्राथमिक शिक्षणाची घडी बसविण्याचे प्रयत्न होऊ लागले. ग्रंथालये व इतर सामाजिक संस्था निघाल्या. गोव्यातील विविध ज्ञातीच्या परिषदा भरू लागल्या ज्ञातिसंस्था स्थापन होऊ लागल्या. ह्या संस्थानी सर्व जातिना मुक्त प्रवेश असलेल्या शाळा व ग्रंथालये स्थापन केली. सारस्वत ब्राह्मण वैश्य समाज, गोमंतक क्षत्रिय नाभिक समाज, गोमंतक मराठा समाज वगैरे ज्ञातीनी या कामी पुढाकार घेतला.

म्हापसेचे 'सारस्वत विद्यालय' या संस्थेची स्थापना अशाच एका ज्ञातिपरिषदेच्या अधिवेशनातून झाली पोर्तुगालांत राज्यक्रांती होऊन त्याचे फायदे गोव्याला मिळण्याच्या सुमारासच गोवा व गोव्याबाहेरील महाराष्ट्र कर्नाटकातील सारस्वत ब्राह्मण समाजांत ज्ञातिविषयक सुधारण्याचे वारे वाहूं लागले होते व विचारविनिमयासाठी अधिवेशने भरू लागली होती. सारस्वतातील पोटजातीचे एकीकरण करण्याचा मुख्य उद्देशाने असे जे एक अधिवेशन १९१० साली म्हापसे येथे भरले – ज्याला एकी परिषद असे म्हटले जाई – त्यांत इतर अनेक ठरावांप्रमाणेच "गोमंतकस्थ ज्ञातिबांधवांच्या प्राथमिक व दुय्यम शिक्षणांस मदत व्हावी म्हणून म्हापसे मुक्कामी एक विद्यालय स्थापण्यांत यावे व त्यांत मराठी पांच इयत्ता इंग्रजी सात इयत्ता व पोर्तुगीज शिक्षण देण्यात यावे" असा एक ठराव पास करण्यात आला होता. गोव्यात रिपब्लिक राजवट आली असली तरी पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाशिवाय इतर कोणत्याही भाषेतल्या वा स्तरावरच्या शिक्षणाची सोय सरकारने केली नव्हती–आणि पोर्तुगीज राजवटीच्या अखेरपर्यंत ती केली नाही–म्हणूनच अशा शिक्षणसंस्था लोकांना स्वतःच्या जबाबदारीवर काढाव्या लागत

# सारस्वत विद्यालयाची स्थापना आणि विस्तार

एकी परिषदेतल्या त्या ठरावानुसार २ मार्च १९११ या दिवशी परिषदेने या कामासाठी नेमलेल्या समितीने सारस्वत विद्यालय या शिक्षण संस्थेची स्थापना केली. या कामी समितीचे कोशाध्यक्ष मुंबईचे कै. शांताराम नारायण तथा बाबासाहेब दाभोळकर व सेक्रेटरी कै. सदाशिव तथा काका दगाईत यांनी पुढाकार घेऊन पुढे संस्थेचे कित्येक वर्षे संगोपन व संवर्धन केले.

विद्यालय स्थापन झाले आणि लगेच वर्ग घ्यायला सुरवात झाली. फक्त ३९ विद्यार्थी आणि कै. परशुराम रामचंद्र सिनारी व सोयराजी रामचंद्र आरंवदेकर असे दोन शिक्षक त्यावेळी होते. एका खाजगी घरांत शाळेचे वर्ग भरत असत. पण पहिल्या वर्षीच सारस्वत विद्यालयात मिळत असलेल्या शिक्षणाचा दर्जा चांगला असल्याची ख्याति सर्वत्र पसरली आणि विद्यार्थ्यांची संख्या भरभर वाढू लागली. दुसऱ्याच वर्षी ती १५६ झाली आणि लवकरच २०० पर्यंत गेली. बालवर्ग ते चौथी असे विद्यालयांत प्रारंभी पांच वर्ग होते ते चार वर्षांच्या आंत मराठी सातवीपर्यंत वाढून आठ झाले. शिक्षकांची संख्या सहापर्यंत गेली. १९१७ साली मी माशेलहून पांचवी पासून पुढले शिक्षण घेण्यासाठी सारस्वत विद्यालयांत गेलों तेव्हां मराठी सातवीपर्यंतचे शिक्षण तिथ दिले जात असे. गोव्यांतून लांबलांबच्या ठिकाणाहून मुद्दाम म्हापशांत आलेले विद्यार्थी शाळेत येत असत. आज– जिथे म्युनिसिपालिटीची इमारत आहे तिथून म्हापशाच्या कोर्टाकडे जाणाऱ्या हमरस्त्यावरच्या एका दुमजली घरांत हे सारे वर्ग भरत असत. मुख्याध्यापक सिनारी होते, ते सहावी व सातवीचे वर्ग घेत आणि त्यांचे सहाय्यक नारायण लक्ष्मण रेगे पांचवीचा वर्ग घेत. हे दोघेही अतिशय मनमिळाऊ आणि अध्यापनांत अत्यंत कुशल असे शिक्षक होते आणि त्यांच्यामुळेच शाळेची कीर्ति सर्वदूर पसरली होती. पण शाळेच्या विद्यार्थ्यांत पुस्तकी शिक्षणाशिवाय शिस्तीला, विद्यार्थ्यांच्या वर्तनाला व खेळांना जे एक खास महत्व होते, तें मात्र तिसरी ( किंवा चौथी ) त्या वर्ग घेणारे आरंवदेकर यांच्यामुळे आले होते. सिनारी–रेगेंनी छडीचा उपयोग फारसा केला नाही, पण आरंवदेकरांचे छडीशिवाय चाललेच नाही. छडीशिवाय आरंवदेकर शाळेंत कधी दिसलेच नाहीत. आरंवदेकर शाळेत आले, आपल्या वर्गांत गेले म्हणजे किलबिल करणारा त्यांचा वर्ग तर गप्प होईच, पण सारी शाळाच शांत असे. पण शिस्तीसाठी ते जेवढे उग्र बनत, किंवा उग्रपणाचे सोंग घेत, तितकेच स्वभावाने ते प्रेमळ होते. विद्यार्थ्यांना जवळ घेऊन मायेने ते त्यांच्या पाठीवरून हातही फिरवीत. आरंवदेकरांनी सारस्वत विद्यालयाला जणू आपले जीवन दिले होतें. शाळा हेच आपले घर मानले होते. शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणाचा त्यांनी ध्यास घेतला होता.

## परशुराम रामचंद्र सिनारी

मुख्याध्यापक सिनारी हे एक त्या काळचे आदर्श शिक्षक होते. वेंगुर्ल्याच्या सरकारी मराठी शाळेंतून निवृत्त होऊन ते म्हापशाला आले होते. मासिक मनोरंजनचे संपादक काशीनाथ रघुनाथ मित्र हे त्यांचे त्या वेळचे एक विद्यार्थि होऊन गेले. सिनारी हे केवळ एक शिक्षक नव्हते, तर विद्वान होते, साहित्याचे व्यासंगी होते आणि लेखकही होते. का. र. मित्रांना साहित्याची जी गोडी लागली ती त्यांच्यामुळे. म्हापशाला त्यांच्या हाताखाली जे विद्यार्थी शिकले त्यांना भाग्यवान म्हटले पाहिजे. दोन्ही हातांनी भरभरून त्यांनी विद्यादान केले. मराठी भाषा नी साहित्य यांच्याबद्दल छात्रांत आवड निर्माण केली.

संतकवी नी पंतकवींच्या कठोण काव्यपंक्ती उलगडून, समजावून, सोप्या करून शिकवल्या. काव्यशास्त्रांतील छंद, वृत्त, अलंकार नी व्याकरणांतील समास, संधी या जटिल गोष्टी बारा वर्षांच्या पोरांच्या जिभेवर खेळविल्या. त्यांची आठवण झाली म्हणजे माझ्या पिढीच्या त्यांच्या विद्यार्थ्याचे ऊर अभिमानाने नी कृतज्ञतेने भरून येते. त्यांच्या सर्व छात्रांच्या वतीने आजच्या या प्रसंगी त्यांना मी श्रद्धांजलि वाहात आहे.

सारस्वत विद्यालयांत मराठी शिक्षणाचे बस्तान दोन वर्षांच्या आंत उत्तम बसले होते, आणि त्यामुळे चालकांचा उत्साह वाढला होता. त्यांनी १९१३ साली एक महत्वाचा निर्णय घेतला व तो अंमलात आणला.

मराठी शिक्षणाबरोबरच इंग्रजी व पोर्तुगीज शिक्षणाचे वर्ग उघडले. वर सांगितल्याप्रमाणें हिंदूंनी पोर्तुगीज शिक्षण घेणे आतां अपरिहार्य होते. रिपब्लिकमध्ये निवडणुका होणार होत्या. धर्मनिरपेक्ष अशा नव्या राजवटीत जे राजकीय हक्क मिळाले होते ते पदरात पाडून घ्यायचे होते. शासनांत शिरून आपला हक्काचा वाटा मिळवायचा होता. पोर्तुगीज शिक्षणाशिवाय आम्हाला आतां गत्यंतर नव्हते. हा सगळा विचार करून चालकांनी १९१३ पासून पोर्तुगीज चार इयत्तांपर्यंतचे शिक्षण देणारे वर्ग सारस्वत विद्यालयांत सुरू केले. या वर्गांना विद्यार्थ्यांकडून प्रतिसादही चांगला मिळाला.

पोर्तुगीज शिक्षणाप्रमाणेच इंग्रजी शिक्षणाची गरजही गोमंतकीयांनी ओळखली होती. गोव्यांतल्या साऱ्याच तरूणांना गोमंतकांत उपजीविकेची साधने उपलब्ध नव्हती. सरकारी नोकऱ्यांचे क्षेत्र अत्यंत मर्यादित होते. व्यापारी व उत्पादक व्यवसायांचा ठणठणाट होता. अर्थात् ब्रिटिश हिंदुस्थानांत, आणि मुख्यत: मुंबईला जाणे अपरिहार्य होते. ख्रिश्चन बांधवांनी हा मार्ग पूर्वीच अनुसरला होता. हिंदूही त्यांचे अनुकरण करूं लागले होते. आणि हा मार्ग धरायचा तर इंग्रजी शिक्षणाची शिदोरी बरोबर असायला हवी होती. सारस्वत विद्यालयांत मराठी चौथ्या इयत्तेच्या पुढें इंग्रजी चौथीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याचे हे कारण होते. या वर्गांना दर वर्षी सुमारे वीसपर्यंत विद्यार्थी येऊं लागले. कै. रामचंद्र सोनबा कामत यांनी हे वर्ग अत्यंत तळमळीने चालविले होते. उत्तम प्रकारचे शिक्षण या वर्गात दिले जाई.

परंतु एका विचित्र कारणामुळें हें वर्ग १९१८ सालांत बंद करावे लागले. माध्यमिक पोर्तुगीज शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर वयोमर्यादेचे कमाल बंधन सरकारने लादल्यामुळें चौथ्या इयत्तेच्या पुढे मराठी व इंग्रजी शिक्षण चालू ठेवणे मुलाना जड जाऊं लागले. आणि म्हणून हे वर्ग बंद करावे लागले.

आणि त्यानंतर तीन वर्षांनी पोर्तुगीज वर्गही बंद झाले. देसाई नांवाचे एक शिक्षक हे वर्ग घेत. प्रिमेर ग्रावच्या परीक्षेला विद्यार्थी पाठविले जात. परंतु १९२१ साली अशी एक घटना घडली की त्यामुळे हे वर्ग बंद करावे लागले. सारस्वत विद्यालयासमोर एक सरकारी प्राथमिक पोर्तुगीज शाळा होती, आणि त्या दोन शाळांच्या इमारतींमध्ये जे पटांगण होते ते दोन्ही शाळांचे विद्यार्थी खेळांसाठी वापरत असत. विद्यार्थ्या विद्यार्थ्यांत भांडणे होत त्यावेळी पोर्तुगीज शाळेचे शिक्षक भांडायला येत. मराठी शाळेत पोर्तुगीज शिकवलेले त्यांना आवडत नसे. आपल्याला हे आव्हान आहे असा त्यांचा विनाकारण समज झाला होता. आणि याच सरकारी शाळेत तर सारस्वत विद्यालयांतील प्रिमेर ग्रावच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पाठविणे भाग होते. तिथे निःपक्षपाती निकाल लागणे कठीण होते.

यावर चालकांनी एक तोडगा काढला. नऊ विद्यार्थ्यांना त्यावर्षी कोलवाळच्या शाळेत परीक्षेसाठी पाठविण्यात आले. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की नऊचे नऊ विद्यार्थी नापास झाले ! या दुर्दैवी विद्यार्थ्यांत चांगले हुषार विद्यार्थी होते, आणि तरीही त्यांना नापास करण्यांत आले ही कारवाई आमच्या शेजाऱ्याची हे न सांगतांच साऱ्यांना कळले आणि त्या वर्षापासून पोर्तुगीज वर्ग बंद करण्यांत आले. हा इतिहास विद्यालयाच्या कुठल्याही अधिकृत अहवालांत नमूद झालेला नसला तरी तो मला माहीत आहे. याचे कारण एवढेच की त्या दुर्दैवी नऊ विद्यार्थ्यांत मी एक होतो !

परंतु १९२१ मध्ये बंद पडलेले पोर्तुगीज वर्ग बारा वर्षांनंतर पुन्हा सुरू करण्यात आले. मात्र या वेळी एक सुधारणा करण्यात आली ती अशी की पूर्वी सातव्या इयत्तेच्या वेळी प्रिमेर ग्रावचे शिक्षण पूर्ण होई, त्याएवजी मराठी चौथ्या इयत्तेत पोर्तुगीज शिक्षण सुरू करून पांचव्या इयत्तेत प्रिमेर ग्रावचे शिक्षण पुर्ण व्हावे अशी व्यवस्था करण्यात आली.

पण याशिवाय पोर्तुगीज भाषेचे स्वतंत्र वर्गही उघडण्यात आले. या वर्गात सरकारी शिक्षणक्रमानुसार सेगुंदग्राव पर्यंतचे स्वतंत्र शिक्षण दिले जाई व विद्यार्थ्यांना सरकारी परीक्षांना पाठवण्यात येई.

## विद्यालयाची स्वतःची वास्तु

१९१९ मध्ये वर उल्लेख केलेली विद्यालयाची स्वतःची वास्तु उभी राहिली होती, व धुळेराच्या रस्त्यावरील भाड्याच्या घरांतून या नव्या वास्तूंत शाळेने स्थलांतर केल होते. त्या घरांतून दोन रांगा करून नव्या इमारतीत विद्यार्थ्यांनी चालत गेलेला तो प्रसंग मला अजूनही आठवतो.

विद्यालयाची ही वास्तु म्हणजे चालकांच्या जिद्दीचे फळ होते. १९११ ते १९१३ या दोन वर्षांतच विद्यार्थ्यांची संख्या दीडशे झाल्याचे वर सांगितलेच. भाड्याच्या जागेत त्या सर्वांची सोय होणें कठीण होऊ लागले, तेव्हां स्वतःची इमारत बांधण्याचा चालकांनी निर्णय घेतला. या वेळी प्रजासत्ताकाचे पहिले गव्हर्नर ना. कोसेयरू द कॉश्त हे होते. उदारमतवादी असल्याने जनतेच्या इच्छा आकांक्षांशी ते समरस झाले होते. शाळा सुरु झाली तेव्हां त्या गव्हर्नरनी सारस्वत विद्यालयास पहिली भेट दिली होती ( दि. १७-५-१९११ ) आणि दोन वर्षांनंतर १८-५-१९१३ या दिवशी ते पुन्हा एकदा विद्यालयाची पाहाणी करून गेले होते. सारस्वत विद्यालयाने चालविलेले ज्ञानदानाचे कार्य त्याना आवडले होते. त्यांनी शाळेला सरकारी जागा मोफत देऊन टाकली. १९१६ साली बांधकामास सुरूवात झाली व तीन वर्षांनंतर १९१९ साली इमारत तयार होऊन शाळेने स्वगृहांत प्रवेश केला. १६ हजार रुपये इमारतीला खर्च आला असे तत्कालीन कागदपत्रांत नमूद आहे.

## काका दणाईतांचे हे स्मारक

इमारत बांधण्याच्या या कामात सगळ्यांचेच सहकार्य मिळाले असले तरी त्यात सिंहाचा वांटा होता तो बाबासाहेब दाभोळकर आणि काका दणाईत यांचा. दाभोळकरानी बरीचशी आर्थिक बाजू सांभाळली तर काकांनी इमारतीच्या पायाभरणीपासून गृहप्रवेशांपर्यंत जे जे करायला हवे ते ते निरपेक्षपणे, तनमनधन अर्पण करून केले. काका दणाईत हे म्हापसे शहराचे त्यावेळचे नेते होते. दहावीस वर्षांपूर्वी पंच मंडळी स्थापन करून गोवा-पंच नावाचे साप्ताहिक त्यानी चालविले होते. गोव्यांतल्या सर्व सार्वजनिक कार्याशी त्यांचा संबंध होता. एकी परिषदेत त्यांनी खूप महत्वाचा वांटा उचलला होता. ही तपश्चर्या सारस्वत विद्यालयाच्या उभारणीसाठी त्यांच्या कामी आली. सारस्वत विद्यालयाची ही इमारत म्हणजे एका परीने काकांचे जाहीर स्मारक होय. १९२७ मध्ये ते निधन पावले पण अखेरच्या दिवसांपर्यंत सारस्वत विद्यालयासाठी ते झटले.

## शारदोत्सव : एक खास वैशिष्ट्य

त्या काळांत सारस्वत विद्यालय हे जसे उत्तम शिक्षणासाठी प्रसिद्ध होते तसेच इतर कांही उपक्रमांसाठीही होते. पहिला उपक्रम म्हणजे त्याचा शारदोत्सव. गोव्यांत नव्याने सुरू झालेल्या शाळांत शारदोत्सवाची प्रथा रूढ झाली होती. परंतु सारस्वत विद्यालयाचा शारदोत्सव ही गोव्यांत एक विशेष घटना होती. नवरात्रांत शारदेची मृण्मय मूर्ति बसवायची. विद्यार्थ्यांनी आरास करायची, पूजा, भजन, प्रार्थना व्हायची आणि दसऱ्याच्या दिवशी मिरवणुकीने तारीवरच्या खाडीत मुर्तीचे विसर्जन करायचे. पांच दिवसपर्यंत संध्याकाळी व्याख्यानसत्र व्हायचे. गोमंतकांतले सर्व नामांकित वक्ते त्या वेळी हजेरी लावायचे. त्यावेळी समाजांत प्रचलित असलेल्या विषयांवर बोलायचे. त्यांच्या व्याख्यानांच्या विषयांची नांवे पाहिली तर समाज-उद्बोधनाच्या या ज्ञानसत्राची कल्पना येते. कांही विषय व वक्ते यांची नावे याखाली देतो.

१९१९ रामचंद्र सोनबा कामत-धर्म व राष्ट्रीयत्व
१९२० शांबाराव सरदेसाई-गोव्यांत कोंकणी की मराठी
१९२२ गणेश शिवराम सामंत–आर्यभूमोचा गोमंतकीयांस संदेश
,, पुंडलिक वामन विर्जिनकर–गोमंतकांतील शेतीची निकृष्टावस्था
,, शांभाराव सरदेसाई–राष्ट्रसेवा
१९२३ रघुनाथ गणेश तळवडकर–आमची मातृभाषा
,, रामचंद्र वा. ना. करंडेशास्त्री–परदेश गमन
१९२४ ,, –प्राचीन भारतीय शिक्षण पद्धति
१९२५ वा. वा. सावर्डेकर-ललितकला व गोमंतक
,, सु. रा. सामंत–हिंदू चालीरीतींचा कायदा
१९२६ रामचंद्र पांडुरंग वैद्य–आर्य वैद्यक
१९२७ वि. क्रु. सांखोळकर–तरूणांवरील जबाबदारी
१९२९ गुंडू सी. आमोणकर–गोमंतक व सामाजिक सुधारणा
१९३० मेघश्याम देशप्रभु–गोमंतक व स्त्रीशिक्षण

वक्ते व विषय यांची वर दिलेली कांही नमुन्याची नांवें पण या विषयांवरून पन्नास वर्षांपूर्वी जे विचारमंथन चालू होते त्याची कल्पना येईल.

या व्याख्यानमालेत वक्त्यांची ओळख करून देण्याचे काम सातवीच्या मुलांकडे देण्यात येई. काका दणाईतांनी वक्त्यांचा परिचय लिहून द्यायचा व परिचायक विद्यार्थ्याने तो पाठ करून धडाधड बोलायचे. सारस्वत विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी वक्तृत्वकला संपादन करावी म्हणून काकांचा हा उपक्रम होता.

## ग्रंथालयाचा उपक्रम

वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन करावे यावरही काकांचा व सिनारी मास्तरांचा कटाक्ष होता. म्हणूनच सारस्वत विद्यालयांत एक ग्रंथालय निर्माण करण्यांत आले. या ग्रंथालयांत चांगले ग्रंथ संग्रहित केले होते. १९२६–२७ च्या सुमारास हे ग्रंथालय सर्व साधारण वाचकांसाठी खुले करण्यांत आले. ग्रंथालयाला जोडून वाचनालय सुरू झाले. वैश्य समाजाचे दुर्गावाचन मंदिर, दैवज्ञ समाजाचे वाचनमंदिर ह्या दोन सार्वजनिक ग्रंथालयांप्रमाणेच सारस्वत विद्यालयाचे तिसरे वाचनमंदिर म्हापशातील वाचनप्रेमी मंडळींना आकर्षित करू लागले. सुमारे दोन वर्षे या ग्रंथालयाचा कारभार मी पाहात होतो. वसंत शांबा दगाळे यांचे मार्गदर्शन आणि माझे मित्र स. पु. दणाईत यांचे सहकार्य मला मिळत होते. हे पुढे आर्थिक टंचाई मुळे १९३१ साली बंद करण्यात आले.

या सर्वसाधारण ग्रंथालयाशिवाय बालवाचनालयाचा जो उपक्रम १९३५ च्या सुमारास सुरु केला होता तो मात्र अखंडपणे चालू आहे. प्रत्येक वर्गातल्या मुलांच्या अवांतर वाचनासाठी वर्गवार छोटी छोटी ग्रंथालये त्यावेळी तयार केली होती-व त्यातील पुस्तके मुलांना घरी वाचायला देण्यात येत. शाळा सुटल्यानंतर एक तासपर्यंत मुलांनी शाळेत बसूनही वाचनाची सोय होती.

## माजी विद्यार्थि संघाच्या चर्चासभा आणि व्यायाम शाळा

सारस्वत विद्यालय सुटले तरी आम्हा माजी विद्यार्थ्यांचा आमच्या या **Alma Mater** शी असलेला संबंध सुटला नव्हता. आम्ही सारस्वत विद्यालय माजी विद्यार्थी संघ १९२० साली स्थापन केला आणि विद्यालय हे आमचे केंद्र बनले. दर रविवारी आम्ही बैठक घेत असू. त्या वेळी एकाद्याने एकाद्या विषयावर निबंध वाचायचा, उत्स्फूर्त भाषण करायचे व त्यावर चर्चा करायची असा उपक्रम सुरु केला होता. 'जागृति' नावाचे हस्तलिखित मासिक काढले होते. १९३० मध्ये मडगांवला झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांत गोव्यांतील हस्तलिखितांत 'जागृति'ला पहिले बक्षीस मिळाले. श्री. बाळकृष्ण भास्कर सु. सरदेसाई यांनीच मुख्यतः 'जागृती'ची जबाबदारी पत्करली होती व हणजूणचे संजगिरी नावाचे माजी विद्यार्थी लिहायचे काम करीत होते. सारस्वत विद्यालयाच्या प्रसंगविशेषी होणाऱ्या कार्यक्रमात आणि दैनंदिन कारभारांतही माजी विद्यार्थि संघातील उत्साही सभासदांची मदत असे. कै. दयानंद बा. बांदोडकर हे एक असे उत्साही विद्यार्थि होते.

पहिली दहा वर्षात माजी विद्यार्थी संघाने पांच संमेलने भरविली व गोव्यातील थोर नेत्यांना संमेलनप्रसंगी अध्यक्षस्थान दिले.

माजी विद्यार्थि संघाने आणखी एक गोष्ट केली ती व्यायामशाळा काढण्याची. नक्की साल आता आठवत नाही, परंतु १९२८ च्या आगेमागे संघाने एक व्यायामशाळा स्थापन करून विद्यार्थ्यांना व्यायामाचे महत्व पटवून दिले. जोर, जोडी, बैठका, नमस्कार, डंबेल्स हे व्यायामाचे प्रकार त्यांत होतेच, पण विद्यालयाची इमारत व पोस्टाची इमारत यांच्या मधल्या बागेत एक मलखांब पुरून त्यावर आम्ही कसरतीचे डाव करीत होतो. कांही दिवस या व्यायामशाळेत खूप उपस्थिति असायची. पुढे हा उपक्रम केव्हां तरी बंद झाला.

## जातिभेद, धर्मभेद व लिंगभेदाचा अभाव

सारस्वत विद्यालय ही शिक्षणसंस्था एका ज्ञातिपरिषदेत स्थापन झाली होती. सभासद एकाच-ज्ञातीचे होते तरी तेथील शिक्षक व तेथे मिळणारे शिक्षण मात्र ज्ञातिपुरते मर्यादित नव्हते. सर्व जातींच्या व सर्व धर्मींच्या विद्यार्थ्यांना सारस्वत विद्यालयांत मुक्तद्वार होते. अगदी सुरवातीपासून मुसलमान व ख्रिश्चन विद्यार्थी अल्पसंख्येने का होईना शाळेत येऊ लागले. कांही वर्षांनी हरिजन विद्यार्थी येऊं लागले. कडक जातिबंधने असलेल्या त्या काळांत ह्या घटना घडल्या होत्या असे आज सांगूनही कुणाला खरे वाटणार नाही. परंतु अहवालांत या विद्यार्थ्यांची तर नोंद आहेच, पण शिवाय माझा तो प्रत्यक्ष अनुभव आहे.

साठ पासष्ट वर्षांमागच्या काळात जिथे महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाला नव्हता, तिथे गोव्यांत स्त्रीशिक्षणाच्या गोष्टी होत्या. आणि आमच्या

लहान लहान मुली बहुसंख्येने त्या सोयीचा फायदा घेत होत्या असे सांगितले तर कुणाला खरे वाटेल काय ? पण ही वस्तुस्थिति होती. १९११ साली विद्यालय निघाले तेव्हां दहा मुली शाळेत यायला लागल्या. हळुहळू ही संख्या वाढू लागली. १९२० नंतर तर इतकी वाढली की मुलींचे प्रमाण एकूण विद्यार्थ्यात एक तृतीयांश झाले. कांही वर्षांनी ही संख्या आणखी वाढली व आज निम्म्यावर आलेली आहे.

त्या काळांत गोव्यांत कर्मकांड सांभाळणारे पण विचाराने प्रगत असे जे समाजधुरीण होऊन गेले त्यांच्या परिश्रमाचे हे फळ होते. दादा वैद्य, करंदेशास्त्री, काका दणाईत, सामंत गुरुजी ही त्यातली कांही नावे. मडगावला राऊत गुरुजींनी या क्षेत्रात केलेले कामही अविस्मरणीय असेच आहे. स्त्रीशिक्षणाच्या वाटचालीचा आजचा वेग तर एवढा प्रचंड आहे की तो पाहून गोव्यातील स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांच्या आत्म्याना स्वर्गातही धन्यता वाटेल.

## मुक्तीनंतरची क्रांती

अधूनमधून आर्थिक चणचण, कार्यकर्त्यांची अपुरी संख्या, अपुरी जागा अशा अडचणी येत गेल्या तरी १९६१ पर्यंत विद्यालयाचे कार्य सातत्याने व नेटाने चालू राहिले. १९ डिसेंबर १९६१ या शुभदिवशी गोमंतक मुक्त झाला आणि १९६२ सालापासून गोव्याच्या सर्वांगीण विकासास प्रारंभ झाला. सर्वच क्षेत्रांत क्रांति म्हणतां येईल असे नेत्रदीपक बदल होऊं लागले. विकासाची नवी क्षितिजे दिसूं लागली. सर्वात अधिक व जलद स्थित्यंतरे झाली ती शिक्षणक्षेत्रात. प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारने पत्करली. माध्यमिक शिक्षणाला भरघोस सरकारी मदत मिळू लागली. मराठी, कोकणी, हिंदी, उर्दू, इंग्रजी आणि जरूरीप्रमाणे इतर भारतीय भाषा ही शिक्षणाचे माध्यम बनले. कला, शास्त्र, वाणिज्य, स्थापत्य अशा विविध ज्ञान शाखांची महाविद्यालये निघाली. मुंबई विद्यापीठाचे पदव्युत्तर केंद्र स्थापन झाले. आणि या सर्व स्तरांवर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आश्चर्य वाटावे इतक्या प्रमाणात वाढली.

या बदलत्या परिस्थितीला गोव्यातल्या पूर्वीच्या सर्व संस्था सामोऱ्या गेल्या आणि त्यानी आपल्या कार्यपद्धतीत व इतर बाबतीत जरूर ते बदल घडवून आणून छात्राना सर्व प्रकारच्या सुविधा निर्माण केल्या. सारस्वत विद्यालयही मागे राहिले नाही. शिक्षणक्षेत्रातल्या विकासातला आपला वाटा त्याने जबाबदारीने उचलला. शिक्षणशास्त्रातल्या नव्या कल्पना, नवे संकेत आत्मसात केले. राष्ट्राचे भावि जबाबदार नागरिक व नेते निर्माण करणे हे शिक्षणसंस्थाचे ध्येय असले पाहिजे ही खूणगाठ मनाशी बांधून संस्थेच्या तरूण चालकानी नव्या युगातील वाटचालीस प्रारंभ केला.

प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी नव्या सरकारने स्वीकारलेली असली तरी खाजगी शिक्षणसंस्था त्याने नष्ट केल्या नव्हत्या. शिक्षणाचा दर्जा उच्च राहावा म्हणून त्या मोडीत काढणें इष्टही नव्हते. सारस्वत विद्यालयांतील प्राथमिक मराठी शिक्षणाला ५० वर्षांची जी एक परंपरा होती ती लक्षात घेऊन चालकांनी आपली शाळा सरकारजमा होऊं न देता तशीच कायम ठेवली आणि वर सांगितल्याप्रमाणें त्यांत नव्या सुधारणांची भर घातली.

## मराठी, इंग्रजी माध्यमिक शाळेचा उपक्रम

नव्या जमान्यांत प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणाची वाढती गरज असल्याचे दिसून येताच १९६५ साली संस्थेने मराठी माध्यमातून माध्यमिक विद्यालय सुरू केले. उत्कृष्ट शिक्षकांची जोड मिळाल्यांमुळे विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. एस्. एस्. सी. बोर्डाकडून विद्यालयास हायस्कुल म्हणून मंजुरी मिळून १९६८–६९ च्या एस्. एस्. सी. परीक्षेस दहा विद्यार्थी पाठविण्यांत आले. आणि अभिमानाची गोष्ट अशी की हे दहाचे दहाही विद्यार्थी उत्तमप्रकारे पास झाले १९७० च्या परीक्षेत विद्यालयाचा माजी विद्यार्थी कु. कृष्णकांत शांताराम रायकर इंग्रजी माध्यमांतून शिकवणाऱ्या हायस्कूलमधून सबंध गोमंतकांत पहिला आला. उत्कृष्ट निकालाची ही परंपरा संस्थेने आजपर्यंत टिकवून ठेवली असून अधिकाधिक विद्यार्थी शालान्त परीक्षेस बसत आहेत. १९७३ च्या परीक्षेस एकूण ३५ विद्यार्थी या परीक्षेस बसले. चालू वर्षी ही संख्या ४६ पर्यंत गेली आहे.

माध्यमिक शाळा–क्षेत्रांत आणखी एक उपक्रम संस्थेने १९७२ पासून सुरू केला तो म्हणजे इंग्रजी माध्यमांतून चालविलेले वर्ग. या वर्षी पांचवीचा वर्ग सुरू झाला व २२ विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश देण्यात आला. १९७३–७४ साली सहावीचा वर्ग सुरू झाला असून दरवर्षी एकेक या प्रमाणे नव्या अभ्यासक्रमानुसार दहावीपर्यंतचे वर्ग वाढविण्यात येणार असून चार वर्षां नंतर इंग्रजी माध्यमांतली पहिली तुकडी एस्. एस्. सी. परीक्षेला बसेल.

आज सारस्वत विद्यालयांत विद्यार्थ्यांची एकूण संख्या पुढील प्रमाणे आहे.

प्राथमिक शाळा–मुलगे १८१, मुली १४९. एकूण ३३०
मराठी माध्यमिक शाळा–मुलगे ६१, मुली १४४. एकूण २०५
इंग्रजी माध्यमिक शाळा–मुलगे ३८ मुली २४ एकूण ६२

याप्रमाणे सारस्वत विद्यालयांतील एकूण विद्यार्थ्यांची संख्या ५९७ एवढी भरते. यांतल्या एकूण मुलींची संख्या पाहिली तर ती मुलांच्या संखेहून अधिक आहे हे दिसून येईल.

उत्कृष्ट शिक्षणाप्रमाणेच खळ, सहली, वक्तृत्व स्पर्धा, क्रीडास्पर्धा, चित्रादी कलास्पर्धा, राष्ट्रीय व इतर दिनांचे कार्यक्रम, नाट्यस्पर्धा असे शालेय व आंतर-वर्गीय कार्यक्रम शाळेत होत असतात. आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धांतून सारस्वत विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी कित्येक पारितोषिके मिळविली असून गोवा, दमण व दीव कला अकादमीने आयोजित केलेल्या शालेय नाट्य-स्पर्धांतून एकांकिकांनाही प्रथम व द्वितीय क्रमांकाची बक्षिसे मिळविली आहेत. वैयक्तिक अभिनयाची पारितोषिकेही कांही विद्यार्थ्यांनी मिळविली आहेत. विद्यालयाची वार्षिक संमेलने ही तर विद्यार्थ्यांच्या अंगातील सुप्त गुणांना वाव द्यायची एक मोठीच संधि असते. कला व क्रीडा या क्षेत्रांत विद्यार्थ्यांना भरपूर वाव मिळावा अशा योजना यावेळी आखल्या जातात.

## विद्यालयाची नवी इमारत

विद्यालयांत मराठी माध्यमिक वर्ग सुरू केल्या-पासूनच संस्थेची स्वतःची इमारत अपुरी पडू लागली होती. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे भाड्याची जागा घेणे भाग पडत होते. पण भाड्याच्या जागेपेक्षा स्वतःची इमारत असणे केव्हांही श्रेयस्कर होते. म्हणून चालकांनी दुसरी इमारत बांधण्याचा निर्णय घेतला. सुदैवाने कै. बाळकृष्ण बाबुराव तेलंग यांनी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी आपल्या इस्टेटींतल्या कांही जमिनी संस्थेला मृत्युपत्रा-न्वये दिल्या होत्या. त्यांतली खोर्ली येथील जमीन संस्थेच्या नव्या इमारतीला उपयुक्त ठरणार होती. म्हणून या जागेवर इमारत बांधायचे ठरवून दि. ७ फब्रुवारी १९६९ या दिवशी गोमंतकांतले सुप्रसिद्ध उद्यो. गपती श्री. वसंतराव धेंपो यांच्या हस्ते पायाभरणी समारंभ पार पडला. तीन वर्षांत ही इमारत पूर्ण झाली व तिला सुमारे तीन लाख रुपये खर्च आला. या इमा-रतीच्या पटांगणात १९७३ सालचा संस्थेचा ६२ वा वर्धापनदिन मोठ्या थाटाने साजरा झाला. संस्थेचे सभासद व हितचिंतक श्री वसंतराव धेंपो अध्यक्ष होते तर संस्थेचे एक माजी विद्यार्थि म्हणवून घेण्यांत भूषण मानणारे मुख्य मंत्री कै. दयानंद तथा भाऊसाहेब बांदोडकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## दात्यास आवाहन

संस्थेची ही जी नवी इमारत बांधली गेली ती संस्थेवर लोभ करणाऱ्या शेकडो हितचिंतकांच्या व आश्रयदात्यांच्या बळावर. संस्थेच्या स्थापनेपासूनच असे सहाय्यक सज्जन लाभत गेले. कै. बाबासाहेब दाभोळ-करांच्या मृत्यू नंतर त्यांचे चिरंजीव श्रीमान लक्ष्मीकांत दाभोळकर यांनी संस्थेच्या आर्थिक बाजूंत लक्ष घालून वडिलांनी जमवलेल्या कायम निधीत भर घालून त्याचा 'सारस्वत विद्यालय ट्रस्ट फंड' निर्माण केला. कै. बाळकृष्ण बाबुराव तेलंग या तरूण गृहस्थाने आपल्या मृत्युपत्रांत संस्थेला कांही जमिनी ठेवल्या. बार्देस म्युनिसिपालिटीने वार्षिक अनुदान दिले तर ना. गव्हर्नर कोसेयरू द कोस्त यांनी संस्थेला जागा उपलब्ध करून दिली. सुरवातीपासूनची ही दात्यांची परंपरा आजपर्यंत चालू असून दोन वर्षांपूर्वी पूर्ण झालेल्या संस्थेच्या नव्या इमारतीस सरकारी अनुदान धरून सुमारे दीड लाखाच्या देणग्या मिळाल्या. पण बँकेकडून काढलेल्या दीड लाख रुपयांच्या कर्जाची फेड अजून व्हायची आहे. नव्या इमारतीत फर्नीचर तयार करण्या-साठी सुमारे ५० हजार रुपयांची गरज आहे. समृद्ध प्रयोगशाळा व ग्रंथालय यांसाठी आणखी ५० हजार

लागतील. म्हणजे एकूण अडीच लाख रुपयांची आज संस्थेला गरज आहे. विद्याभिलाषी दात्यांकडून व संस्थेच्या उच्चपदस्थ माजी विद्यार्थ्यांकडून व सर्वसामान्य जनतेकडून संस्थेला मदत होऊन ती कर्जमुक्त व स्वयंपूर्ण होईल अशी आशा आहे.


## अमृत महोत्सवाचा सुयोग

१९६१ मध्ये सारस्वत विद्यालयाला ५० वर्षे पूर्ण झाली. म्हणून १९६२ साली संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याची कल्पना निघून सुवर्णमहोत्सव समिति नियुक्त करण्यांत आली. कार्यक्रम निश्चित करण्यांत आला. परंतु त्याच सुमारास भारत–चीन युद्ध सुरू झाल्यामुळे समाजजीवन विस्कळित झाले. कार्यकर्त्यांचा उत्साह मावळला व सुवर्ण महोत्सवाची कल्पना मागे पडली.

१९७१ साली अमृतमहोत्सवाचा योग आला होता. परंतु या वेळी नव्या इमारतीच्या कामाच्या गर्दीत या महोत्सवाकडे लक्ष देता आले नाही. आतां इमारत पूर्ण होऊन तिथे वर्गही भरत आहेत. इतर कामांकडे लक्ष देणे शक्य होत आहे. म्हणूनच अमत महोत्सवाचा समारंभ संस्थेच्या ६३ वर्धापनदिनी साजरा करण्याचा सुयोग येत आहे.

गोव्याचे राज्यपाल माननीय श्री. शिशिरकुमार बानर्जी व मुख्यमंत्री माननीय सौ. शशिकला काकोडकर आजच्या या शुभप्रसंगी उपस्थित आहेत. स्व. भाऊसाहेब बांदोडकरांच्या पुढाकाराने हा महोत्सव साजरा होणार होता. परंतु दुर्दैवाने आकस्मिकपणे ते आमच्यांतून निघून गेले. परंतु या प्रतिकूल परिस्थितींतही त्यांच्या सुकन्या सौ. काकोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज हा समारोह साजरा होत आहे ही संस्थेच्या जीवनांतली परम भाग्याची गोष्ट आहे असे आम्ही समजतो, आणि जिच्या आशीर्वादाने हा सुयोग लाभला त्या विद्यादात्री शारदेला अभिवादन करतो.

**बा. द. सातोस्कर**
स्वागताध्यक्ष



श्री. बा. द. सातोस्कर

4

# ६ : काका दणाईत व सिनारी गुरुजी

मागच्या एका लेखात सिनारी गुरुजींचा निसटता उल्लेख आला आहे व त्यांनी आम्हा सहावी–सातवीच्या मुलांना ज्ञानेश्वरांपासून अनंत फंदीपर्यंतच्या मराठी कवींचा परिचय करून दिला असे म्हटले आहे. त्यांच्याविषयी आणखी एकदोन वाक्ये लिहिली आहेत. परंतु तेवढ्याने सिनारी गुरुजींबद्दलची पूर्ण कल्पना वाचकांना येणार नाही आणि त्याना शब्दतिलांजली अर्पण [illegible] समाधान होणार नाही. म्हणून आज स्वतंत्रपणे त्यांच्याविषयी चार शब्द, त्यांचा सहवास सुटल्यानंतर साठ वर्षांनी लिहीत आहे, आणि सिनारी गुरुजींबद्दल लिहीत असतानाच काका दणाईत व सारस्वत विद्यालय यांच्यासंबंधीची माहिती ओघानेच येणार आहे.

## सारस्वत विद्यालय : एक वरदान

माझ्या आजवरच्या जीवनात आलेली सारस्वत विद्यालय संस्था हे एक नियतीने दिलेले वरदान आहे असे मी मानतो. हे वरदान लाभले नसते तर संपादक व साहित्यिक म्हणून जे कांही थोडेबहुत यश मला लाभले ते लाभलेच नसते. मागे उल्लेख केल्याप्रमाणे १९१७ ते १९२१ ही चार वर्षे मी सारस्वत विद्यालयात शिकत होतो. नंतरही सातआठ वर्षे या ना त्या नात्याने संस्थेशी संबंध होता. या संबंधामुळे आणि म्हापशातील एका तपाच्या दीर्घ वास्तव्यामुळे माझा आणि माझ्यासारख्या अनेक संस्कारक्षम मुलांचा पिंड घडला, त्यांच्या बुद्धीला धार आली, मने संवेदनक्षम झाली, कला, साहित्य, वक्तृत्व यांचे संस्कार झाले, सामाजिक



श्री सदाशिव आनंदराव दणाईत

जाणिवांचे बीज अंकुरित झाले, राष्ट्रीयत्वाला जाग आली आणि जगात कांही आदर्श आहेत, त्या आदर्शाप्रत आपल्याला जायचे आहे याचे भान आले. एकाच वाक्यात सांगायचे तर सारस्वत विद्यालयात शिकलेल्या अनेक विद्यार्थ्यांत स्वतःचे व्यक्तिमत्व निर्माण झाले, ते वाढत गेले. चिटकोबा कृष्णाजी सांखोळकर, गुंडू सीताराम आमोणकर, दिनकर विठ्ठल तथा तात्या आमोणकर, विश्वनाथ उपेंद्र भोबे, कृष्णाजी तथा चिंतामणी शांताराव सरदेसाई, आनंद मंगेश आणि बाळकृष्ण मंगेश सरदेसाई, सर्वोत्तम पुरुषोत्तम दणाईत ही माझ्याप्रमाणेच सारस्वत विद्यालयात संस्कारांकित झालेली कांही व्यक्तिमत्वे.

## काका दणाईतांचे कार्य

विद्यार्थ्यांची ही व्यक्तिमत्वे घडविण्याची क्रिया मुख्यत्वेकरून काका दणाईत व परशुराम रामचंद्र सिनारी या दोघा थोर पुरुषांनी केली. काका दणाईत हा एक सौम्य, स्निग्ध, शांत वृद्धत्वाचा नमुना होता. निरलसता, उत्साह, शिक्षणाविषयी आस्था, समाजकल्याणाची व समाज सुधारणेची तळमळ, राष्ट्रीयत्वाची निष्ठा आणि विद्यार्थ्यांतून आदर्श नागरिक निर्माण करण्याची कळकळ हे गुण त्यांच्या या ठेंगण्या ठुसक्या मूर्तीत सामावले होते. सारस्वत विद्यालय हे त्यांच्या उत्तरायुष्यातील अखेरचे पर्व होते आणि हे पर्व त्यांच्या पूर्वजीवनातील पर्वांपेक्षा अधिक उज्ज्वल व त्यांच्या एकूण जीवनाचे सार्थक करणारे व कायमचे स्मारक ठरणारे होते.

काका दणाईतांच्या पूर्वजीवनातील एकदोन महत्त्वाच्या घटनांचा या ठिकाणी अल्पसा परामर्श घेतो, त्यावरून त्यांच्या कर्तृत्वाची थोडीबहुत कल्पना येईल. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात समाज-सुधारणेच्या व स्वराज्यसंपादनाच्या ज्या चळवळी झाल्या त्याचे पडसाद गोव्यांतील सुशिक्षित हिंदू समाजात उमटत होते आणि महाराष्ट्रातल्या वृत्तपत्रांच्या अनुकरणाने १८७२ पासून राष्ट्रीय बाण्याची व सामाजिक सुधारणेचा प्रचार करणारी पत्रे गोव्यात निघू लागली होती. महाराष्ट्रा-तल्याप्रमाणे राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा काढण्याचे प्रयोगही होऊ लागले होते. अशा वेळी म्हणजे १८८० च्या सुमारास रामचंद्र दत्तात्रय

आजरेकर यांनी म्हापशाला अशीच एक शाळा काढली व त्यानंतर त्यांचे लक्ष समाजसुधारणेकडे वळले. काका दणाईत, कृष्णाजी सांखोळकर, बाबुराव घनश्याम तेलंग, श्रीपाद व्यंकटेश वागळे वगैरे प्रगत विचारांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने गोवा पंच नांवाचे एक साप्ताहिक १८८६ साली त्यांनी सुरू केले. मध्ये दोनदा बंद पडत ते १८९९ पर्यंत चालले. गोवा-पंच या नांवावरून ते चालवणाऱ्या पांच तरुण मंडळीला पंच मंडळी असे नांव पडले. या पंच मंडळीचे प्रमुखत्व कार्यकुशलतेमुळे साहाजिकच काका दणाईतांकडे आले आणि त्यांनीच ते अखेरपर्यंत चालवण्याचा भार उचलला.

याच काळात काकासाहेबांवर एक गंडांतर आले. १८९५ साली दादा राण्यांनी पोर्तुगीजांविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. दादा राण्यांच्या व काका दणाईत यांच्या घराण्यात सख्य होते. राण्यांना काकांची फूस असेल अशा कल्पनेने सरकारने त्यांच्यावर व इतर कांही लोकांवर वॉरंट काढले, तेव्हा काकासाहेब सीताराम आमोणकर, अनंतराव लाड व वकील कारव्हाल्यु यांच्यासह घोड्यावर स्वार होऊन तेरेखोलची खाडी पार करून कांही काळ रेडीला जाऊन राहिले व बंडाची धामधूम संपल्यावर परत आले.

त्यानंतरचे त्यांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे एकी परिषद्. गोव्यांतील मागासलेला हिंदु समाज सर्व क्षेत्रात पुढे यायचा असेल तर त्या समाजांत असलेल्या जाती एकत्र आल्या पाहिजेत असे त्यांस वाटत होते. पण या एकीकरणाची पहिली पायरी म्हणजे एकाच जातीतील पोटजाती नष्ट व्हायला हव्यात असेही त्याचे मत होते. म्हणूनच मंगळूर व बेळगाव येथे सारस्वत समाजांतील पोटजातींचे एकीकरण करण्यासाठी ज्या दोन परिषदा भरल्या होत्या तशीच तिसरी परिषद् गोव्यांतील प्रगत मताच्या सारस्वतांतील पुढाऱ्यांनी म्हापसे येथे १९११ साली भरविण्याचे ठरवले व काका दणाईतांनी त्यात पुढाकार घेतला आणि ती अनेकांच्या मदतीने यशस्वी करून दाखविली.

याच परिषदेचे एक फलित म्हणजे सारस्वत विद्यालयाची स्थापना. नांव जरी ज्ञातिवाचक असले आणि कार्यकारिणीत सारस्वतांचाच पुढाकार असला तरी या विद्यालयात सर्व जातींच्या, धर्मांच्या व अस्पृश्य विद्यार्थ्यां-



नाही शिक्षण दिले जात होते. माझ्याच वर्गात सवर्ण, हरिजन, ख्रिश्चन, मुस्लिम मुले शिकत होती हे मला आवर्जून सांगावेसे वाटते.

काकांना मी १९१८ साली प्रथम पाहिले ते पोलीसचौकीजवळ सारस्वत विद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामावर देखरेख करतांना. तिथली कामे आटोपून धुळेरातील टेकडीवर एका भाड्याच्या घरात चालू असलेल्या सारस्वत विद्यालयात ते एकादी फेरी मारत नी मग घरी जात. त्यांचा नातू आनंद हा माझ्याच वर्गात होता. त्यामुळे काकांच्या घरात माझा प्रवेश झाला आणि तिथे त्या वेळच्या अनेक पुढाऱ्यांना मी पाहिले आणि त्यांच्याशी न बोलता देखील त्यांना पाहूनच धन्यता वाटली. काकांच्या कार्याबद्दल या पुढाऱ्यांना किती आदर होता हे त्याच वेळी कळले. काका कधी व्यासपीठावर दिसले नाहीत, इतरांप्रमाणे त्यांनी भाषणे केली नाहीत; पण विद्यार्थ्यांनी वकील व्हावे, लेखक व्हावे, विद्वान व्हावे याचा मात्र निष्ठेने प्रयत्न केला. शांबाराव व मंगेशराव सरदेसाई बंधू यांनीही सारस्वत विद्यालयाच्या प्रगतीला महत्त्वाचा हातभार लावला.

## खरा शिक्षक सिनारी गुरुजी

सारस्वत विद्यालयातील अध्यापनाचा भार त्या वेळी सिनारी, रेगे व आरंवदेकर या तीन शिक्षकांवर मुख्यत्वेकरून होता. पांचवीचे रेगे गुरुजी शांत, सुस्वभावी व कवी होते. ते शिकवतही चांगले म्हणून विद्यार्थीप्रिय होते. तिसरीचे आरंवदेकर मास्तर म्हणजे एक 'टेरर' असे समजले जाई. त्यांच्याच वर्गातली नव्हे तर साऱ्याच वर्गातली मुले त्यांना वचकून असत. शिस्तीला ते सर्वाधिक महत्त्व देत. विद्यार्थी अभ्यास न करता आला, गैरहजेरीची चिठ्ठी पालकांकडून आणली नाही, कुणी मोठ्याने बोलला तर त्यांच्या हातातल्या छडीचा प्रहार कुठे नी कसा होई याचा अंदाज येणे कठीण होते. शाळेचे ते जणू डिक्टेटर होते. ते आपल्या वर्गात ओरडून बोलले तर सबंध शाळेतील मुलांचा थरकांप होई.

असे हे आरंवदेकर शाळेत टेरर होते; पण बाहेर मात्र मृदुभाषी असत. विद्यार्थ्यांना शिस्त लागावी म्हणून ते शाळेत उग्र रूप धारण करीत पण त्यांच्या स्वभावात प्रेमाचा ओलावाही होता. कित्येक वर्षांनंतर त्यांच्या एका विद्यार्थ्याला पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईला पाठवले

आणि मला उद्देशून लिहिलेले एक पत्र त्याच्याजवळ दिले. ते पत्र वाचून मी हेलावून गेलो आणि त्यांच्या अत्यंत नाजुक मनाचा एक कप्पा— एक गुह्य मला कळले तेव्हा माझे डोळे पाणावले.

आरवंदेकरांच्या नेमके विरुद्ध मुख्याध्यापक सिनारी गुरुजींचे व्यक्तिमत्त्व होते. ते खूपसे वृद्ध होते. शांत, स्थिरचित्त होते. विद्वान होते, लेखक होते, भाषा व साहित्य यांचे जाणकार होते आणि उत्कृष्ट शिक्षक होते. छडीचा व त्यांचा छत्तीसाचा आंकडा. सहावी व सातवीचे वर्ग ते घेत. त्या दोन वर्षांत त्यांनी आम्हा मुलांना मराठी भाषा व व्याकरण यात तरबेज करून सोडले. साहित्याची नुसती गोडीच लावली असे नव्हे तर ज्ञानेश्वरांपासून संत व पंत कवी आणि शिवशाही व पेशवाईतील शाहीर यांच्या काव्याची फोड करून सांगितली. रघुनाथ पंडीत, श्रीधर, महिपती तुकाराम हे आम्हाला समजत. पण ज्ञानेशाची ओवी, मोरोपंतांची आर्या आणि वामनाचा श्लोक अशी कठीण कवचीची फळे फोडून आंतल्या गराचा गोडवा काय असतो याचे पाठ दिले. पुढे बीए व एमए ला लागलेले वृत्तदर्पण, काव्यादर्श, काव्यदीपिका ही पुस्तके शिकवली. गण व मात्रावृत्ते, छंद, यति, यतिभंग, लघुगुरु शब्दभेद अशा काव्यातल्या अनेक गोष्टी शिकवल्या. नवनीतांतल्या अनेक कविता पाठ करायला लावल्या. अकरा बारा वर्षांच्या आम्हा मुलांच्या गळी आणि मनीही या गोष्टी उतरवणे ही सामान्य गोष्ट नव्हे.

साहित्याप्रमाणेच मराठी भाषेची त्यांची जाणकारीही जबरदस्त होती. दादोबा पांडुरंगाचे लघु व्याकरणच नव्हे तर मोठे व्याकरणही आम्हाला शिकवले. व्याकरण हा लिखित भाषेचा प्राण याची जाण त्यांनीच आम्हाला करून दिली. त्यांच्याकडून ज्या थोड्यांनीच हे मनःपूर्वक ग्रहण केले ते खरे भाग्यवान. या भाग्यवानांपैकी मी एक होतो हे सांगयला मला आजही अभिमान वाटतो आणि आज ६५ वर्षांनंतरही या माझ्या आदरणीय गुरुजींना मनोमन वंदन करावेसे वाटते.

मराठीच्या या अभ्यासामुळेच मी गोव्यांतला मराठी घेऊन मॅट्रिक झालेला पहिला विद्यार्थी ठरलो आणि मनोरंजनकार काशीनाथ रघुनाथ



मित्रांचा गुरुबंधु ठरलो हे मागे सांगितलेच आहे. पण मित्रांशी जुळलेले गुरुबंधुत्वाचे नाते कसे जुळले त्याचा किस्सा मात्र इथे सांगणे जरूर आहे.

मोठ्या ग्रंथालयातील पुस्तके अत्यंत थोड्या वेळात हाती यावीत म्हणून डॉ. शियाळी राममृतम् रंगनाथन् यांच्या द्विबिंदु वर्गीकरण पद्धतीच्या तिसऱ्या आवृत्तीवर कलम करून एक नवी पद्धती मी शोधून काढली होती व १९५० ते १९५६ अशी पांच वर्षे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातल्या पुस्तकांवर तिचा प्रयोग करीत होतो. या काळांत १८०५ ते १९५५ या दीडशे वर्षांत प्रसिद्ध झालेली बहुतेक पुस्तके आणि मासिके मी चाळत होतो, वाचत होतो. हे वाचत असतांना मनोरंजन मासिकाचे संपादक का. र. मित्र यांच्या निधनानिमित्त प्रसिद्ध झालेल्या मनोरंजनच्या अंकात मित्रांचे चरित्र दिले होते. त्यात मित्रांचे प्राथमिक शिक्षण वेंगुर्ल्याच्या सरकारी प्राथमिक शाळेत, परशुराम रामचंद्र सिनारी या शिक्षकांच्या हाताखाली झाले आणि त्यांच्यामुळेच मित्रांना मराठी साहित्याची गो[illegible] असा उल्लेख होता. हा उल्लेख वाचला आणि माझ्या अंगावर सरसरून कांटा उभा राहिला! सिनारी गुरुजी वेंगुर्ल्याच्या शाळेतून निवृत्त होऊन म्हापशाला आले हे माहीत होते. पण त्यांनी मित्रांप्रमाणेच मलाही शिकवले होते! म्हणजे प्रथम दर्जाच्या मनोरंजन मासिकाचे संपादक, कित्येक कादंबऱ्यांचे लेखक, बंगाली भाषेचे जाणकार आणि भाषांतरकार, गडकरी, बालकवी, टिळक, रेंदाळकर, कोल्हटकर, टेंगे, हिराबाई पेडणेकर, काशीबाई कानिटकर अशा थोरामोठ्या गद्य पद्य लेखक–लेखिकांना प्रकाशात आणणारे मित्र आणि मराठी लेखनात व प्रकाशनक्षेत्रात लुडबुड करणारा मी गुरुबंधु! हा शोध लागला तो माझ्या आयुष्यांतला केवढा मोठा भाग्याचा क्षण!

## राष्ट्रीय वृत्ती

काका दणाईतांप्रमाणे सिनारी गुरुजी हेही राष्ट्रीय वृत्तीचे होते. याचा प्रत्यय एक दिवस प्रकर्षाने आला. १९२० च्या १ ऑगस्टला शाळा उघडली, सामुदायिक प्रार्थना झाली, वर्ग सुरू झाले आणि दहाला शाळा सुटली. दुपारी तीन वाजता पुन्हा शाळेत गेलो. तेव्हा शाळेत

निस्तब्ध शांतता नांदत होती. काका दणाईत होते, सिनारी गुरुजींसह सर्व शिक्षक मधल्या हॉलमध्ये जमले होते. मुले येत होती. वर्ग भरण्याची चिन्हे दिसत नव्हती. आरंबदेकर मास्तरांच्या हातात छडी नव्हती ! काहीतरी विलक्षण घडले असले पाहिजे याची मला कल्पना आली.

सारी मुले आली आणि मग काका दणाईत यांनी ती दुष्ट, वाईट वार्ता आम्हाला सांगितली. पूर्वरात्री लोकमान्य टिळकांचे मुंबईत निधन झाले होते. सिनारी गुरुजींनी मग लो. टिळकांच्या चरित्राचा, चारित्र्याचा व कार्याचा आम्हाला परिचय करून दिला. त्यांच्या त्या भाषणाने आम्हा मुलांना लो. टिळक भारताचे अनभिषिक्त राजे होते हे त्या वेळी कळले. कारण त्या वेळच्या पाठ्यपुस्तकांत टिळक, गांधी ही नांवे आम्ही वाचली नव्हती. "श्री पंचम जॉर्ज भूप धन्य धन्य विभुधमान्य सार्वभौम भूवरी" राज्य करीत असल्याची माहिती चौथीच्या पुस्तकांतली पहिलीच कविता आम्हाला देत होती. तशी सारस्वत विद्यालयातल्या व्याख्यानमालेतून भारतीय स्वातंत्र्य[illegible] ऐकली होती. नौरोजी टिळक, गोखले, रानडे, गांधी ही नांवे कानावर पडली होती. पण त्यांच्या कामगिरीचा पुरेसा अर्थ कळण्याचे ते वय नव्हते. पण टिळकांच्या निधनानिमित्त झालेल्या सिनारी गुरुजींच्या भाषणाने आम्ही एकदम मोठे झालो. माझ्या भारतीयत्वाचा एक नवा साक्षात्कार अकराव्या वर्षी माझ्यावर झाला तो आजतागायत धगधगत आहे. गोवा–महाराष्ट्र–हिंदुस्तान एक आहे हे सिनारी गुरुजींनी उच्चारलेले वाक्य आजही माझ्या कानांना ऐकू येत आहे !



# ७ : गानतपस्विनी अंजनीबाई मालपेकर

माझ्या जीवनात अविस्मरणीय आणि अभिमानास्पद असे जे काही थोडेच सोन्याचे दिवस येऊन गेले त्यांतला कै. अंजनीबाई मालपेकर यांचा सत्कार झाला तो एक. अंजनीबाई संगीतक्षेत्रांत एक तपस्विनी होऊन गेल्या. सर्व नामवंत घराण्यातील थोर उस्ताद त्यांच्या ज्ञान-साधनेपुढे नम्र होत. बडे गुलामअली खांसारखे नामवंत गायक त्यांच्या घरी गेले तर त्यांच्यासमोर खुर्चीवर न बसता गालिच्यावर बसत आणि तरुण कुमार गंधर्व त्यांच्या पायाशी बसत. संगीतक्षेत्रात चौफेर ज्ञानसाधना केलेल्या एकमेव गायिकेचे नाव सांगा असे कुणी एकाद्या संगीतातील जाणकाराला विचारले तर ते नाव असेल अंजनीबाई मालपेकरांचे. श्रुतिसुभग, माधुर्याने परिपूर्ण, चिजेतील शब्दांना अर्थ देणारे, अर्थ अभिनयातून व्यक्त करणारे आणि स्वरातून रसाविष्करण करणारे गाणे कुणाचे, असा प्रश्न सत्तर वर्षांपूर्वी सर्व घराण्यांची गाणी ऐकलेल्या एकाद्या संगीतलुब्ध वृद्ध श्रोत्याला तुम्ही विचाराल, तर तो एकच नाव घेईल ते अंजनी मालपेकरांचे.

अशा या अलौकिक गायिकेला १९५८ साली केंद्रीय संगीत-नाटक अकादमीच्या पहिल्या फेलो म्हणून निवडण्याचा मान दिला गेला आणि त्यांचा एक जाहिर सत्कारसमारंभ मुंबईच्या लक्ष्मीबागेत झाला. अनेकांची त्यांच्या गुणवर्णनपर भाषणे झाली. बडे गुलामअली खांचे अविस्मरणीय गाणे झाले आणि या समारंभाच्या अध्यक्षपदाची माळ माझ्या गळयात पडली. हा दिवस माझा भाग्यदिन होता असे

सारस्वत विद्यालय या
संस्थेची स्थापना व वाढ
यासाठीं, ज्या सद्‌गृहस्थांचे
प्रयत्न कारणीभूत झाले
त्या सर्वांना बहुशोपतः
कै. काकासाहेब दपाईत,
कै. बाळकृष्ण बा. तेलंग
यांस सादर अभिवादन!

# — प्रणाम —



पूज्य कै. काका देसाई




पूज्य कै. बाळकृष्ण ह. टेलें



गुरुवर्य कै. सोयराजी रामचंद्र आरंवदेकर



गुरुवर्य कै. परशुराम रा. सिनारी



गुरुवर्य कै. महादेव श्रीधर आपटे